P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

## प्रेसनोट दिनांक – १०/०९/२०२४

### दि. ०९/०९/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिजवडी १०३०/२०२४ भा.न्या.सहीता कलम १०९,१८९(२),१९०, १९१(२), १९१(३),१२७(२),१२७(२) सह कलम ४/२५ भा.ह.का.,३७(१)(३) चे उल्लघन १३५ म.पो.का |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०८.०९.२०२४ रोजी रात्री ०९.०० वा ते १०.०० वा दरम्यान विठठल मंदिरासमोर बापुजी बुवा मंदिराजवळ फेज -३,हिंजवडी(गवारवाडी) ता.मुळशी जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०९/०९/२०२४ रोजी ०४/१० वा |
| फिर्यादी | :- | विशाल प्रकाश देवकर, वय ३० वर्ष, धंदा बांधकाम व्यवसाय रा.घोटावडे ता.मुळशी जि.पुणे |
| आरोपी | :- | अक्षय साधु कापसे वय २९ वर्ष,२)मनोहर साधु कापसे वय ३५ वर्ष,३) साधु कापसे रा.हिंजवडी ४) अमोल सुदाम धुमाळ ५) निलेश सुदाम धुमाळ रा.धुमाळवाडी<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मामे भाउु जेल मधुन जामिनावर सुटल्याने व त्याची तबीयत ठिक नसल्याने त्यास भेटण्याकरीता फिर्यादी मोटार सायकलवर बापुजी बुवा मार्गे जात असतांना विठठल मंदिर जवळ निलेश धुमाळ यांनी फिर्यादी यांना हात करुन थांबवले व अमोल धुमाळ, मनोहर कापसे यांनी फिर्यादीस पकडले व साधु कापसे यांनी फिर्यादीचे थोबाडीत मारली.अक्षय कापसे व साधु कापसे यांनी समोर थांबुन फिर्यादी यांचा रस्ता आडवल्याने फिर्यादीनी सर्वाना ढकलुन दिले व पाहीले असता अक्षय कापसे, मनोहर कापसे व अमोल धुमाळ यांचे हातात कायते होते त्यामुळे ते जिव वाचण्यासाठी जंगलाचे दिशेने पळत असतांना कोणीतरी मागुन फिर्यादीचे डोक्यात कोयत्याने वार केला.फिर्यादी घाबरुन जंगलात पळुन गेले तेंव्हा त्यांना मोठयाने फटाक्याचा आवाज आला असल्याचे सांगतीले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि झोल ८२७५३८७४७७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९८२/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०९/०९/२०२४ रोजी ०८.३० वा चे पुर्वी तुळजाभवानी पानशॉपचे शेजारी फुटपाथ काळेवाडी फाटा ते तापकीर चौक बिआरटी रोड धनगरबाबा मंदीर जवळ एचपी पेट्रोलपंपासमोर थेरगाव पुणे याठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.०९/०९/२०२४ रोजी १९.४३ वा |
| फिर्यादी | :- | श्वेता रंजित घोरपडे, वय ३४ वर्षे , सहा.पोलीस निरीक्षक वाकड पोस्टे, |
| आरोपी | :- | **अज्ञात इसम** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी मयत इसम नामे अली अन्सारी , वय ३५ वर्षे अंदाजे, पुर्ण नाव पत्ता माहिती नाही यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन घटनास्थळी मिळुन आलेल्या पेवरब्लॉक ने मारहाण करुन जिवे ठार मारले आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि चव्हाण, मोनं-९८२३२४१५३९ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ३५८/२०२४ भा.न्या.सं.कलम – २०५, ३०८(१), ३१६(२), ३१८(४), ३१९(२), ३३६(३), माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी), ६६(डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०४/०९/२०२४ रोजी १३/३० वा.पासून ते दि. ०९/०९/२०२४ रोजी सकाळी १०/०० वा. चाफेकर चौक, चिंचवड, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०९/०९/२०२४ रोजी १८/२८ वा |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी , वय-६० वर्षे, धंदा-सेवानवृित्त, रा. चाफेकर चौक, चिंचवड, पुणे |
| आरोपी | :- | १)एसबीआय कस्टमर सर्व्हिसमधील अंकित यादव, मोबाईल क्रमांक ९९७७७५५४२०<br>२)मुंबई पोलीस म्हणुन बोलणारे पोलीस मोबाईल क्रमांक ९५६९३३४६०६,<br>३)सीबीआय मधील नवज्योत सिम्मी मोबाईल क्रमांक ८३०७८१३९३०<br>४)डेव्हलपमेंट बँक ऑफ सिंगापुर खाते क्रमांक - ८८३०२१००००००८८८४<br>एसबीआय खाते क्रमांक - ४३२६८६५०८८५ बँक अकाऊंट धारक |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना १) एसबीआय कस्टमर सर्व्हिसमधील अंकित यादव, मोबाईल क्रमांक ९९७७७५५४२० (२) मुंबई पोलीस म्हणुन बोलणारे पोलीस मोबाईल क्रमांक ९५६९३३४६०६, (३) सीबीआय मधील नवज्योत सिम्मी मोबाईल क्रमांक ८३०७८१३९३० (४) डीबीएस (डेव्हलपमेंट बँक ऑफ सिंगापुर) खाते क्रमांक - ८८३०२१००००००८८८४ (५) एसबीआय खाते क्रमांक - ४३२६८६५०८८५ यांचेविरुध्द ह्या बँकअकाऊंट धारकांनी तसेच फिर्यादीचे पैसे ज्या बँक खात्यावर वळवून घेण्यात आले आहे त्या बँक खात्याचे धारक व वापरकर्ते यांनी फिर्यादीशी एसबीआय कस्टमर सर्व्हिसमधील अंकित यादव, मुंबई पोलीस ड्रेस घालुन फिर्यादीशी व्हिडीओव्दारे बोलणारे पोलीस, सीबीआय मधील नवज्योत सिम्मी यांनी फिर्यादीची आर्थिक फसवणुक करण्याचे उद्देशाने पोलीस, सीबीआय अधिकारी, व बँक कर्मचारी असल्याची तोतयागिरी करुन, मला सुरेश अनुराग यांनी २.५ कोटी रुपयांचे फ्रॉड केसमध्ये अटक करण्याची भिती घालुन फिर्यादीचे बँक खात्यातील रक्कम डिजीटल करन्सी चेक करुन ती व्हेरिफाय करुन परत करतो असे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन माझेकडुन जबरदस्तीने व अप्रामाणिकपणाने रक्कम सुपुर्द करण्यास भाग पाडुन एकुण- १,०८,००,०००/-रुपये घेवुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मुल्ला ९८२३५९८१०० |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ५२०/२०२४ भादवि कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २०१७ ते २०२३ चेदरम्यान प्लॉटनं. १,२,३,२०,२१,२२ चिखली डिस्ट्रिक्ट सेंटरनक्षत्र फेज -२, मौजे चिखली पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०९/०९/२०२४ रोजी २०/२० वा |
| फिर्यादी | :- | प्रदिप पोपटलाल कर्नावट वय ५४ वर्ष धंदाकंस्ट्रक्शन रा. २३७/१८, शिवाजीपार्कचिंचवड पुणे |
| आरोपी | :- | १)श्री. प्रमोद भाईचंद्र रायसोनी, २. श्री. किरीट मावजी पटेल<br>३. श्री. अमृतलालकांजीनिसार, ४. श्री. प्रशांत मणिलाल संघवी<br>५. श्री. संदेश मिश्रीलाल चोपडा, सर्व पुर्ण पत्ता माहिती नाही.<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी आरोपी क्र.१ ते ५ यांचे सोबत एलोराबिल्ड स्पेसेस प्रा. लि. या नावाने प्लॉटनं. १,२,३,२०,२१,२२ चिखली डिस्ट्रिक्ट सेंटरनक्षत्र फेज -२, मौजे चिखली पुणे येथे बांधकाम प्रकल्प सुरु केला. त्यामध्येफिर्यादी सह वरील सर्व डायरेक्टर होते. सदर गृह प्रकल्पामध्ये १५० फ्लॅट व २३ दुकाने होती.. सदरचा व्यवसाय हा भागीदारीमध्येकरण्याचे ठरले होते. त्यामध्येफिर्यादी यांना५ टक्केनफ्याचा वाटा ठरला होता. सन २०११ ते २०१७ पर्यंतएलोराबिल्ड स्पेसेस प्रा. लि. या संस्थेचा आर्थिक व्यवहार फिर्यादी व अमृतनिसार व किरीट पटेल असे पाहत होते.नमुद गृह प्रकल्पातील ऑफिसनं. ई - १०१ हे अमृतलालनिसार व प्रशांत संघवी यांचेकुलमुखत्यारधारक प्रतिकजैन यांनीकिरीट पटेल व प्रशांत संघवी यांनाविक्रीकेले. त्यातील कोणताही मोबदलाफिर्यादी यांना मिळाला नाही. नमुद गृह प्रकल्पातील ऑफिसनं. ई- १०२ हे अमृतलालनिसार व प्रशांत संघवी यांचेकुलमुखत्यारधारक प्रतिकजैन यांनीकिरीट पटेल व प्रशांत संघवी यांनाविक्रीकेले. त्यातील |

कोणताही मोबदलाफिर्यादी यांना मिळाला नाही.नमुद गृह प्रकल्पातील फ्लॅट नं. डी - १२०४ हे किरीट मावजी पटेल व प्रशांत संघवी यांचेकुलमुखत्यारधारक प्रतिकजैन यांनी अमृतलालनिसार यांनाविक्रीकेले. त्यातील कोणताही मोबदलाफिर्यादी यांना मिळाला नाही. नमुद गृह प्रकल्पातील फ्लॅट नं. डी /अे - १००३ हे अमृतनिसार व प्रशांत संघवी यांचेकुलमुखत्यारधारक प्रतिकजैन यांनीकिरीट पटेल व प्रशांत संघवी यांनाविक्रीकेले. त्यातील कोणताही मोबदलाफिर्यादी यांना मिळाला नाही.नमुद गृह प्रकल्पातील ऑफिसनं. ई- १०३ हे अमृतलालनिसार व प्रशांत संघवी यांचेकुलमुखत्यारधारक प्रतिकजैन यांनीकिरीट पटेल व प्रशांत संघवी यांनाविक्रीकेले. त्यातील कोणताही मोबदलाफिर्यादी यांना मिळाला नाही.नमुद गृह प्रकल्पातील फ्लॅट नं. डी - ७०१ हे अमृतनिसार व प्रशांत संघवी यांचेकुलमुखत्यारधारक प्रतिकजैन यांनीकिरीट पटेल व प्रशांत संघवी यांनाविक्रीकेले. त्यातील कोणताही मोबदलाफिर्यादी यांना मिळाला नाही. नमुद गृह प्रकल्पातील ऑफिसनं. ई-१३, ई-१४ हे संदेशचोपडा, प्रमोद रायसोनी व प्रशात संघवी यांनी प्रशांत संघवी यांनाविक्रीकेले. त्यातील कोणताही मोबदलाफिर्यादी यांना मिळाला नाही. सन २०२३ मध्येफिर्यादी यांना २ दुकाने यातील आरोपी प्रशांत संघवी यांनीदिनांक ०८/०२/२०२३ रोजीविकतदिलेबाबत ना-हरकत प्रमाणपत्रदिले. त्याबदल्यातकरारकेला परंतुते शॉप फिर्यादी यांनानदेता मे २०२३ मध्ये प्रमोद रायसोनी, संदेशचोपडा व प्रशांत संघवी यांनी प्रशांत संघवी यानांविकलेला आहे. अशी फिर्यादी यांची वरील आरोपी यांनीएकुण ५ ते ५.५ कोटी रुपयाची फसवणुक केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि खारगे९०११००२३३३

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ९८३/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६(१),१२५ अ, ३२४ (४) मो.वा.कायदा कलम १८४,१८५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०९/०९/२०२४ रोजी दुपारी ४/१५ वाजताचे सुमारास भुमकर चौकाकडुन ताथवडे बाजुस सर्व्हीस रस्त्याने जात असताना डिकेथलॉन स्टोअर समोरील रस्त्यावर ताथवडे पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.०९/०९/२०२४ रोजी २३/३६ वा

फिर्यादी :- अक्षय दिगंबर गिरी वय-२० वर्ष,धंदा-खाजगी नोकरी,रा.राधेसदन बिल्डींग कोहीनुर पार्क रोड,शनिमंदीर मागे ताथवडे पुणे

आरोपी :- लोकेश रामे गौडा वय-४५ वर्षे रा. घरकुल चिखली पुणे
आरोपी अटक आहे

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्याचे स्प्लेंडर टु व्हिलर नंबर एम.एच.-२३ बीके-८९१४ यावरून भुमकर चौकाकडुन ताथवडे बाजुस सर्व्हीस रस्त्याने जात असताना डिकेथलॉन स्टोअर समोरील रस्त्यावर ताथवडे पुणे येथे फिर्यादीचे पाठीमागुन आलेले मनपाचा कचरा गोळा करणारा ट्रक नंबर एम.एच.१४ एच.यु.२५९० यावरील चालक नमुद आरोपी याने त्याचे ताब्यातील ट्रक हा दारू पिऊन, भरधाव वेगाने, हयगयीने चालवुन फिर्यादीचे टु व्हीलरला पाठीमागुन धडक देवुन फिर्यादीचे पायास दुखापत करून फिर्यादीचे गाडीचे नुकसान केले आहे. तसेच पल्सर मोटार सायकल नंबर एम.एच.३१ डी.एम.०६७९ यावरील अमोल चंदु फलके वय-४५ वर्षे रा.सेलेस्टीयल सिटी फेज-२ रावेत पुणे याचे गाडीला धडक देवुन त्यात गाडीचे नुकसान करून, अमोल चंदु फलके याला गंभीर दुखापत करून त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि सुर्यवंशी
७२७६६४५९८७

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ३८३/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ४२०,४०६,३४ व माहीती तं.कायदा कलम ६६ डी प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२२/०४/२०२४ ते २८/०५/२०२४ रोजी पर्यंत तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पूणे

गुन्हा दाखल :- दिनांक ०९/०९/२०२४ रोजी १९/३९. वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी, वय-३७वर्षे, व्यवसाय - गृहीणी, रा. तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पूणे,

आरोपी :- १). प्रोफेसर देव व्यास फर्म ज्यूपिटर इंन्स्टियुट नाव पत्ता माहित नाही, २).पेग ब्रिंस पुर्ण नाव पत्ता

माहित नाही, ३). आँर्थर व्यास पुर्ण नाव पत्ता माहित नाही.

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ यांचा फिर्यादी व फिर्यादीचे पती यांनी E211 Dev Vyas Equity Business School हा व्हॉट्सअप ग्रुप जॉइन केला.व आरोपी क्रं २ या व्यक्तिने फिर्यादी व त्यांचे पती यांना वेळोवेळी प्रोफेसर देव व्यास फर्म ज्युपिटर इंन्सिटुयट यांची माहिती देवुन शेअर ट्रेडिंग करिता त्यांचा मो.क्र.७०८४६९१७०५, ७८९३४७८०७८, ८३२७४३४५५८ ४४७५६५८६३४८६,८६९५१९७८९८, वरून व्हॉट्सअप मेसेज करून फिर्यादी यांना विश्वासात घेवुन जॅम्बीन या अँपची https://chat.whatsapp.com /CjwN9MpwSHjBsyg2YwNWMS लिंक पाठवुन ती डाउनलोड करणेस सांगितली. त्यामुळे फिर्यादी यांनी जॅम्बीन हे अँप डाउनलोड केले. तसेच E211 Dev Vyas Equity Business School या व्हॉट्सअप ग्रुप वरिल सभासद असलेला आरोपी क्रं ३ या व्यक्तिने त्याचा मो.क्र.८७१२१९७४९९ यावरून फिर्यादीस व्हॉट्सअप मेसेज करून फिर्यादीस विश्वासात घेवुन ज्युपिटर इंन्सिटयुट हे सेबी रजिस्टर असलेबाबत सांगुन जॅम्बीन या अँपवरून शेअर घेणेस सांगितले. त्यामुळे आरोपी क्रं २ या व्यक्तिने सांगितलेप्रमाणे फिर्यादी व त्यांचे पतीने त्यांचे वेगवेगळया खात्यावरती शेअर ट्रेडिंगकरिता एकुण २३,७०,०००/- रू व फिर्यादीचे पतीने एकुण १८,७५,०००/- रू ऑनलाईन पध्दतीने पाठविले होते. परंतु आरोपी क्रं २ या व्यक्तिने फिर्यादी यांना आणखी आय.पी.ओ साठी एकुण ४६,००,०००/- रू भरणेस सांगितले असता, फिर्यादी यांना ऑनलाईन फसवणुक झाली असलेबाबत लक्षात आलेनंतर फिर्यादी यांनी आरोपी क्रं २ यास संपर्क केला असता, त्याने त्याचा फोन रिसिव्ह केला नाही. व फिर्यादी व त्यांचे पतीस त्यांचे व्हॉट्सअप गृपमधुन रिमुव्ह केले. अशा वरील आरोपी मजकुर यांनी फिर्यादी व त्यांचे पतीची एकुण ४२,४५,०००/- रू.ची आर्थिक फसवणूक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि रायन्नवार सो ९८२१२७६३९२